# प्रतीकात्मक वाटप
## Notional Partition

डॉ. संजय कुंडेटकर,
उपजिल्हाधिकारी
बी.ए; एन.डी.; डी.मॅग; एम.बी.ए;
एम.डी.; पीएच. डी.



केंद्र शासनाने हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ हा हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ मध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी अंमलात आणला. यानुसार हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ च्या कलम ६ मध्ये खालील सुधारणा केल्या आहेत.

✓ हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ कलम ६ (१) - मिताक्षर कायद्याने नियंत्रीत केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये सहदायकाची कन्या:

(अ) ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो, त्याच रीतीने जन्मापासून, तिच्या स्वत:च्या हक्कामुळे पुत्राप्रमाणेच सहदायाद होईल.

(ब) सहदायिकीतील मालमत्तेमध्ये तिला पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार असतील.

(क) सहदायिकीतील मालमत्तेमध्ये कन्येलाही पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार, दायित्वे, प्राप्त होतील.

तथापि, दिनांक २० डिसेंबर २००४ पूर्वी ज्या वाटण्या घडून आल्या असतील त्यांना उपरोक्त तरतुदींमुळे बाधा येणार नाही.

(२) उपरोक्त प्रमाणे हिस्सा मिळालेली स्त्री, त्या हिस्स्याबाबत मृत्युपत्रद्वारे किंवा अन्य प्रकारे अशा मिळकतीची विल्हेवाट सुध्दा लावू शकेल.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्यान्वये ९ सप्टेंबर २००५ पूर्वी जन्मलेल्या मुलींना तसेच दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असलेल्या हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क असेल अशी तरतुद केली होती. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६/१०/२०१५ रोजी दिवाणी अपिल क्र. ७२१७/२०१३ (प्रकाश आणि इतर विरुध्द फुलवती आणि इतर) प्रकरणात निकाल देऊन *'वडिलोपार्जित हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क मिळणारी मुलगी आणि त्या मिळकतीत हक्क असणारा सहदायक (कोपार्सनर) हे दोन्ही दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असावेत, मग ती मुलगी कधीही जन्मली असो.'* असे निर्देश दिले आहेत.

यामुळे आता एखाद्या एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकतीत हक्क असणारा सहदायक (कोपार्सनर) आणि त्या मिळकतीत हक्क असणारी मुलगी दिनांक ९.९.२००५ रोजी हयात असेल तर त्या मुलीला मुलाइतका वाटा त्या मिळकतीत मिळेल हे स्पष्ट होते.

परंतु एखाद्या एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकतीत हक्क असणारा सहदायक (कोपार्सनर) दिनांक ९.९.२००५ पूर्वी मयत असेल तर त्याच्या मुलीला प्रतीकात्मक पध्दतीने मिळकतीचे वाटप होऊन किती हिस्सा मिळेल हे खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

# उदाहरण:

एका एकत्र हिंदू कुटूंबाचा कर्ता दिनांक ९.९.२००५ पूर्वी मयत झाला.

त्याच्या नावे नऊ एकर शेतजमीन असून त्याला एक पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असे वारस आहेत.




एकूण मिळकतीचे
प्रथम
तीन हिस्से होतील
मयत व्यक्तीचा
हिस्सा
एक तृतियांश (१/३)
मयत व्यक्तीच्या
विधवेचा हिस्सा
एक तृतियांश (१/३)
मयत व्यक्तीच्या
मुलाचा हिस्सा
एक तृतियांश (१/३)

त्यानंतर
मयत व्यक्तीच्या एक तृतियांश हिश्शाचे पुन्हा तीन हिस्से होतील

- मयत व्यक्तीच्या विधवेचा हिस्सा

  एक नवमांश (१/९)

- मयत व्यक्तीच्या मुलाचा हिस्सा

  एक नवमांश (१/९)

- मयत व्यक्तीच्या मुलीचा हिस्सा

  एक नवमांश (१/९)


प्रत्येक वारसाला मिळणारा एकूण हिस्सा
मयत व्यक्तीच्या विधवेला
१/३ + १/९
मयत व्यक्तीच्या मुलाला
१/३ + १/९
मयत व्यक्तीच्या मुलीला
१/९

उपरोक्त मयत व्यक्तीच्या नऊ एकर शेतजमिनीतुन त्याच्या विधवेला चार एकर, मुलाला चार एकर आणि मुलीला एक एकर असा हिस्सा प्रतीकात्मक वाटपानुसार मिळेल.



मयत व्यक्तीला एकापेक्षा जास्त मुली असल्या तर प्रथम मिळकीचे तीन हिस्से होतील आणि दुसऱ्या टप्प्यात मुलींच्या संख्येप्रमाणे हिस्से वाढतील.



# धन्यवाद

# Thank You

**डॉ. संजय कुंडेटकर,**

उपजिल्हाधिकारी